PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Terminal Examination (2024-25)
## Standard - IX

**Subject - MARATHI** | **Marks - 80**
**Date - 14.10.2024** | **Time - 8.00 am to 11.00 am**

## विभाग १ – गद्य (१८)


**प्र. १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

क्रीडेच्या क्षेत्रात जातिभेद नाही, धर्मभेद नाही की वर्णभेद नाही. येथे सर्वांना समान संधी मिळते. अमेरिकेतील जेसी ओवेन्स हा वंशाने आफ्रिकी खेळाडू. १९३६ मध्ये बर्लिनला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत त्याने चार अजिंक्यपदे मिळवली. इतकेच नव्हे, तर त्या चारही बाबतींत त्याने नवे उच्चांक प्रस्थापित केले. अमेरिकेच्या यशाचा तो मोठा शिल्पकार ठरला. अमेरिकेनेच नव्हे, तर साऱ्या जगाने या खेळाडूचा त्या वेळी केवढा गौरव केला ! केवढे कौतुक केले ! ओवेन्सचा वर्ण, त्याचा देश हे सर्व विसरून साऱ्या जगाने त्याची प्रशंसा केली.

एमिल झेटोपेक हा झेकोस्लोव्हाकियाचा खेळाडू. १९५२ साली त्याने हेलसिंकीचे मैदान गाजवले. तेथे त्याने ५,००० मीटर धावणे व मॅरेथॉन या लांब पल्ल्याच्या शर्यतीत नवीन विक्रम केले व नवा इतिहास घडवला. जगातील एक 'मानवी रेल्वे इंजिन' अशी झेटोपेकने ख्याती मिळवली. यामुळे जगातील सर्व लोकांना झेटोपेकबद्दल तर अभिमान वाटलाच; पण त्याबरोबर झेकोस्लोव्हाकिया देशाबद्दलही त्यांच्या मनात आदर निर्माण झाला.

आफ्रिकेतील इथियोपियाचा अबेबे बिकिला या खेळाडूने तर अनवाणी पायाने मॅरेथॉन - लांब पल्ल्याची शर्यत जिंकली ! एवढे मोठे अंतर त्याने २ तास १५ मिनिटांत काटले. फॅनी बँकर्स या स्त्री- खेळाडूने तर १९४८ साली ऑलिंपिकचे मैदान दणाणून सोडले. १०० व २०० मीटरच्या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवला.

**अ) आकृतिबंध पूर्ण करा.** (आकृती काढणे आवश्यक) **(१)**




**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) झेटोपेकने कोणत्या नावाने ख्याती मिळविली होती?

२) हेलसिंकी येथे ऑलिंपिक सामने कोणत्या साली झाले होते?

**क) खालील प्रश्नांची एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(१)**

१) १९३६ साली ऑलिंपिक सामने या ठिकाणी झाले - [ ]

२) १०० व २०० मीटरच्या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवणारी स्त्री खेळाडू - [ ]


**ड) स्वमत** **(३)**

'ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व' ही संकल्पना स्पष्ट करा.

**प्र. १ (ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

कोणताही नवा शोध एकाएकी लागत नाही. निरीक्षण, अनुमान, प्रयोग, पुन्हा पुन्हा प्रयोग करणे हे चक्र सतत चालूच असते. एडिसनने प्लेटिनमचा उपयोग करून पाहिला. तो थोडा फार यशस्वी झाला; पण असला महागडा प्रयोग व्यवहार्य नव्हता. उन्हाळ्याचे दिवस. हातातल्या पंख्याने वारा घेत असताना एडिसनचे लक्ष पंख्याच्या काडीकडे गेले. ''या बांबूपासून कार्बन तयार करता येईल का ?'' मनात विचार आला, की लगेच प्रयोगांना सुरुवात. हा बांबू कोणत्या जातीचा असावा? उष्ण कटिबंधात विशेषतः आफ्रिका आणि आशिया खंडात बांबूच्या असंख्य जातींची लागवड केली जाते. यापैकी कोणता बांबू उपयुक्त ठरेल याचा शोध घेणे आवश्यक होते. बांबूच्या जाती गोळा करण्यासाठी एडिसनच्या सहकाऱ्यांनी आफ्रिका खंडात हजारो मैल पायी प्रवास केला. त्या ठिकाणी त्यांना हिंस्त्र पशूंशी आणि मलेरियाशी सतत सामना करावा लागला. बांबूच्या जाती गोळा करण्यासाठी एडिसनने पाण्यासारखा पैसा खर्च केला. त्यातून त्याने सहा हजार प्रकारच्या बांबूच्या जाती गोळा केल्या. बांबूपासून तयार केलेली फिलॅमेंट ही अधिक काळ प्रकाश देणारी ठरली; पण अजूनही त्याच्या मनाचे पूर्ण समाधान झाले नव्हते. प्रयोग सतत चालूच होते. हे प्रयोग चालू असताना एडिसनचे चहा, जेवण आणि झोप हे सारे प्रयोगशाळेतील टेबलावरच. भूक लागली, की उभ्या उभ्याच थोडेसे खायचे, थकल्यासारखे वाटले, की बसल्या बसल्या थोडीशी डुलकी घ्यायची. तरीही कामातून थोडीशी फुरसत मिळाली, की एडिसन त्याच्या सहकाऱ्यांना समुद्रावर मासे मारायला किंवा नृत्याच्या नाही तर गाण्याच्या कार्यक्रमांना घेऊन जायचा. मन ताजेतवाने झाले की पुन्हा कामाला सुरुवात.

**अ) १) आकृतिबंध पूर्ण करा. (आकृती काढणे आवश्यक)** **(२)**




**आ) खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

१) एडिसनने किती हजार बांबूच्या जाती गोळा केल्या?

**इ ) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.** **(१)**

१) बाबूंच्या जाती गोळा करण्यासाठी .................

१) एडिसनने प्रयोगशाळा तयार केल्या.

२) एडिसनने त्यांची लागवड केली.

३) एडिसनने पाण्यासारखा पैसा खर्च केला.

४) एडिसनने कर्ज घेतले

**ई) स्वमत :** **(३)**


तुमच्या मनात येणारा नवीन विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल ?

**प्र. १ (क) खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखालील कृती करा.**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आदर्श शासनकर्ता, जाणता राजा, श्रीमान योगी अशा विविध नावांनी छत्रपती शिवाजी महाराजांना संपूर्ण जगात ओळख प्राप्त झाली आहे. त्यांना मिळालेले हे यश सहजसोपे होते का ? महाराष्ट्र म्हणा अथवा संपूर्ण हिंदुस्तान पारतंत्र्यात असताना, मोगल, आदिलशाही, निजामशाही सामान्य जनतेचे लचके तोडत असताना राजमाता जिजाबाईंनी पाहिलेल्या स्वराज्याच्या स्वप्नाची पूर्तता करण्याची शपथ शिवरायांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी घेतली.

स्वराज्याची निर्मिती करणे दूरची गोष्ट तसा विचार करणेदेखील सोपे नव्हते. अंगी असलेल्या सामर्थ्यानिशी, मावळ्यांच्या साथीने, आपल्या चाणाक्ष बुद्धीने, योग्य नियोजनाने महाराजांनी आपल्यापेक्षा बलाढ्य शत्रूचा पराभव केला. सहयाद्रीच्या कडेकपारींत घोडदौड करणारे, नजरकैदेतून स्वतःसह आपल्या मावळ्यांची सुटका करणारे, अफझलखान, शायिस्तेखान यांना नामोहरम करणारे छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे बुद्धी, धैर्य, शौर्य, पराक्रम आणि जिददीचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. महाराजांचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांनी कधी जाती - धर्मासाठी संघर्ष केला नाही. त्यांचा संघर्ष होता मानवतेसाठी, म्हणूनच त्यांना रयतेचा राजा म्हटले जाते.

**(अ) खालील आकृतिबंध पूर्ण करा.** (आकृती काढणे आवश्यक) **(२)**




**आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) छत्रपती शिवाजी महाराज कशाचे मूर्तिमंत उदाहरण आहेत?

२) छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्वात मोठा गुण कोणता ?

## विभाग २ - पद्य (१६)

भेटीलागीं जीवा लागलीसे आस ।
पाहे रात्रंदिवस वाट तुझी ।।१।।

पूर्णिमेचा चंद्रमा चकोरजीवन ।
तैसें माझें मन वाट पाहे ।।२।।

दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली ।
पाहातसे वाटुली पंढरीची ।।३।।

भुकेलिवा बाळ अति शोक करी ।
वाट पाहे उरि माउलीची ।।४।।

तुका म्हणे मज लागलीसे भूक ।
धांवूनि श्रीमुख दांवी देवा ।।५।।

**प्र. २ (अ) समान अर्थाच्या काव्यपंक्ती शोधून लिहा.** **(२)**

अ) पूर्णिमेचा चंद्रमा हेच चकोर पक्ष्याचे जीवन असते.

ब) तसेच माझे मन तुझी वाट पहात आहे.

**(ब) योग्य जोड्या जुळवा.** **(२)**

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) दिवाळीच्या मुळा | अ) अति शोक करी |
| २) भुकेलिवा बाळ | ब) दांवी देवा |
| ३) तुका म्हणे | क) लेंकीं आसावली |
| ४) धावूनि श्रीमुख | ड) मज लागलीसे भूक |

**(क) कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा.** **(२)**

१) आस   २) शोक   ३) मज   ४) मुख

**(ड) स्वमत :** **(२)**

संत तुकारामांनी पांडुरंगाच्या भेटीबाबत दिलेल्या दृष्टान्तातील तुम्हांला आवडलेला दृष्टान्त स्पष्ट करा.

**प्रश्न २ (ब) पुढील दिलेल्या मुद्दयांना अनुसरून कवितेचे रसग्रहण करा.**

'व्यायामाचे महत्त्व' या कवितेचे पुढील मुद्दयांना अनुसरून रसग्रहण करा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री - (१)

२) कवितेच विषय - (१)

३) कवितेतील खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा. (२)

व्यायामे जडत्व जाई दूरी । व्यायामे अंगी राहे तरतरी ।
रक्तव्यवस्था उत्तम शरीरी । वाढे विचारी सजीवपण ।।

४) कवितेतून मिळणारा संदेश - (२)

५) कविता आवडण्याची कारणे - (१)

६) कवितेतील खालील शब्दांचे अर्थ लिहा. (१)

१) भोजन २) कार्य

## विभाग ३ - स्थूलवाचन (६)

**प्र. ३ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(६)**

(१) 'व्यंगचित्र हे व्यक्तीचे गुण - दोष मांडण्याचे प्रभावी अस्त्र आहे', हा विचार सोदाहरण स्पष्ट करा.

(२) टिपा लिहा.

अ) वैजयंती   ब) गायबगळे

(३) 'व्यंगचित्रे रेखाटणे' ही कला आत्मसात करण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते यासंबंधी तुमचे विचार लिहा.

(४) 'काझीरंगा ही कर्दमभूमी आहे.' हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

## विभाग ४ - भाषाभ्यास (व्याकरण) (१६)

**(अ) खालील चौकट पूर्ण करा.** **(५)**

| वाक्य | उपमेय | उपमान | साधर्म्यदर्शक शब्द | समान गुण | अलंकार |
|---|---|---|---|---|---|
| १) आकाशातील चांदण्या जणू फुलांची उधळण | | | | | |
| २) रोहनचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे. | | | | | |

**(आ) खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** **(१)**

सखू आजि सहज बोलायला लागली तरी कवीताच बोलायची.

**(इ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) ध्वज - २) शरीर -

**(ई) खालील नामांची सामान्यरुपे लिहा.** **(१)**

१) बाग - २) वारा -

**(उ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) स्तुती - २) तरुण -

**(ऊ) खालील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.** **(१)**

१) चिमणीने घरट्याबाहेर मान काढली व किलबिलाट केला.

**(ए ) खालील शब्दांचे वचन बदला.** **(१)**

१) गाव- २) मशाल -

**(ऐ) खालील वाक्यांचे प्रकार ओळखा.** **(१)**

१) बाहेर पाऊस पडतो आहे का?

२) हे अन्न शिळे आहे.

**(ओ) खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

१) स्त्री २) नाग -

**(औ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** **(२)**

१) पोरकं होणे -

२) लक्ष वेधून घेणे -

३) झुंबड होणे -

**(अं) खालील वाक्यांचा काळ बदला.** **(१)**

१) पावसाळ्यात येथे पाणी साचते. (वाक्य भविष्यकाळी करा)

## विभाग ५ - उपयोजित लेखन (२४)

**प्र. ५ (अ) पत्रलेखन**

**(१) खालील निवेदन वाचून सुचनेनुसार पत्रलेखन करा. (कोणतेही १)** **(६)**

**विद्या स्टेशनरी मार्ट**

**बालदोस्तांसाठी खास सवलत**

* सर्व प्रकारच्या स्टेशनरीवर ४० % सूट
* हस्तकला, चित्रकला, सजावटीचे साहित्य मिळेल.
* शाळेची सर्व प्रकारची वहया - पुस्तके उपलब्ध.
* घाऊक खरेदीवर घरपोच डिलिव्हरी मोफत

पत्ता : विद्या स्टेशनरी मार्ट, अक्षता सदन, एल. बी. एस. मार्ग, मुलुंड (प)
मुंबई - ४०० ०४६.

विदयार्थी प्रतिनिधी या नात्याने

| | | |
|---|---|---|
| शाळेतील हस्तकला कार्यशाळेसाठी हस्तकलेच्या साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा. | **किंवा** | हस्तकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल तुमच्या मित्राचे / मैत्रिणीचे पत्राद्वारे अभिनंदन करा. |

**(आ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(५)**

**(१) दिलेल्या विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**
शालेय गणेवशांच्या दुकानाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**(२) वृत्तांत लेखन -**
तुमच्या शाळेत साजऱ्या झालेल्या 'शिक्षक दिनाचा' वृत्तांत लिहा.

**(३) कथा लेखन -**
**खालील मुद्दयांवरून गोष्ट तयार करा. गोष्टीस योग्य शीर्षक दृया.**

मुद्दे - राजाची दवंडी - सूर्योदयापासून चालायला सुरुवात - सूर्यास्तापर्यंत मूळ जागी यायचे - चालून होईल तेवढी जमीन चालणाऱ्याला बक्षीस - एक सावकार - चालायला सुरुवात - परतण्याचे भान नाही - सूर्यास्ताच्या वेळी जाणीव - अतिश्रमाने मृत्यू - तात्पर्य

**(इ) पुढील उतारा वाचून त्यावर प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे येतील असे पाच प्रश्न तयार करा. (५)**

आपल्या परिसरातून आपण हिंडल्यास सर्व ठिकाणी सामाजिक स्वच्छतेचा अभाव दिसून येतो. काही सुशिक्षित लोकही सार्वजनिक ठिकाणी घाण करताना दिसतात. सिनेमागृहे, आगगाडया, स्टेशने, एस. टी, स्टँड, शाळा, इस्पितळे अशा सार्वजनिक ठिकाणी अजनूही कचऱ्याचे ढीग दिसून येतात. काही ठिकाणी तर सांडपाण्याची दलदल, उंदीर, घुशी यांचे दर्शन घडते. यामुळे आपले सार्वजनिक आरोग्य धोक्यात येते. साथीचे रोग पसरण्याचा धोका निर्माण होतो.

म्हणूनच सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकू नये. सार्वजनिक आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. त्यासाठी विदयार्थीदशेतच स्वच्छतेची सवय लावावी. यासाठी वैयक्तिक स्वच्छता पूर्णपणे आत्मसात केली पाहिजे. वैयक्तिक स्वच्छतेनंतर सार्वजनिक स्वच्छतेच्या सवयी अंगी बाणवणे सोपे जाते.

**(ई) निबंधलेखन (८)**

**खालील विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळींत निबंध लिहा.**

१) आई संपावर गेली तर...............!
(घरामध्ये शांतता - कोणाचाही धाक नाही - घरामध्ये सगळ्यांची काळजी कोण घेणार ? - सर्व कामे स्वतःच करावी लागतील - घरातील सारे व्यवहार ठप्प - घराची घडी विस्कटणे - तोटे)

२) मी पाहिलेला किल्ला -
(किल्ल्याची अवस्था - पाहण्यासारख्या गोष्टी - पूर्वीचे दिवस - आजची परिस्थिती - आठवणी - प्रवास - अविस्मरणीय अनुभव - इतिहासाचा साक्षीदार)

३) मी राष्ट्रध्वज बोलतोय -
(प्रस्तावना - राष्ट्रध्वज - देशाची ओळख - अस्तित्वाचे प्रतीक - ध्वजाचे स्वरूप - राष्ट्रध्वजाचा गौरवशाली इतिहास - प्रतित अर्थ - त्याग, बलिदान, देशभक्तीची भावना - दुःख)

❖❖❖